दिन विशेष...

१५६५ : विजयनगर साम्राज्याची समाप्ती झाली.

१६६४ : शहाजीराजे भोसले यांचे अपघाती निधन झाले.

१८९७ : नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा जन्म कटक येथे झाला.

१९१९ : राम गणेश गडकरी यांचा स्मृतिदिन.

१९५० : रसायनशास्त्र नोबेल विजेते ऑटो डायलस यांचा जन्मदिन.

महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ८२,३०७.३७ +३९७.७३ (०.४९%)
डॉलर ₹ ९१.६४

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३१ | १४ |
| दिल्ली | १९ | १३ |
| मुंबई | ३० | २१ |
| नागपूर | २९ | १६ |
| पुणे | ३१ | १२ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | शुक्रवार, दि. २३ जानेवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ७५ किंमत : ५ रु. | पाने ४


### सुविचार

शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान नव्हे, तर आयुष्य समजून घेण्याचा मार्ग आहे.

सुर्योदय - सुर्यास्त
स.-७:०७ संध्या-६:१२

### सोने – चांदी

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,५५,४४०/- ३,२५,०००/-

### केळी भाव

नवती : १३५५ ते १३६०
पिल बाग : ११०१ ते ११०२
कांदे बाग : ----

# राज्यातील २९ पैकी १५ महापालिकांवर महिला राज



## जळगाव ओबीसी (महिला), धुळे खुला प्रवर्ग(महिला)

वृत्तसंस्था । मुंबई

**महाराष्ट्रातल्या २९ महानगरपालिकांमध्ये नुकत्याच निवडणुका पार पडल्या आहेत. या निवडणुकांमध्ये भाजपा सर्वात मोठा पक्ष ठरला असला, तरी काही महानगरपालिकांमध्ये भाजपाला सहकारी पक्ष किंवा प्रसंगी विरोधी पक्षातील काही गटांचा पाठिंबा घेण्याची तजवीज करावी लागली.**

तर दुसरीकडे राज्यात सत्तेत एकत्र असणाऱ्या पक्षांना स्थानिक पातळीवर आपल्याच मित्रपक्षाविरोधात उभं राहण्याचा निर्णय घेण्याचे सर्वाधिकार स्थानिक नेत्यांवर देण्याची वेळ ओढवली. या पार्श्वभूमीवर एकीकडे सत्तास्थापनेबाबत जवळपास सर्वच महानगरपालिकांमध्ये राजकीय नाट्य रंगत असताना दुसरीकडे महापौरपदाची सोडत हादेखील चर्चेचा विषय ठरला होता. ही सोडत अखेर जाहीर झाली आहे.

### ➤ महिलांसाठी महापौरपद राखीव झालेल्या महापालिका

मुंबई महानगरपालिका खुला प्रवर्ग, जालना महानगरपालिका अनुसूचित जाती, लातूर महानगरपालिका अनुसूचित जाती, अहिल्यानगर महानगरपालिका ओबीसी, अकोला महानगरपालिका ओबीसी, चंद्रपूर महानगरपालिका ओबीसी, जळगाव महानगरपालिका ओबीसी, धुळे महानगरपालिका खुला प्रवर्ग, पुणे महानगरपालिका खुला प्रवर्ग, नागपूर महानगरपालिका खुला प्रवर्ग, नांदेड-वाघाळा महानगरपालिका खुला प्रवर्ग, नवी मुंबई महानगरपालिका खुला प्रवर्ग, मीरा-भाईंदर महानगरपालिका खुला प्रवर्ग, नाशिक महानगरपालिका खुला प्रवर्ग, मालेगाव महानगरपालिका खुला प्रवर्ग.

### २९ महापालिकांमधील आरक्षणाचं गणित

अनुसूचित जमाती १, अनुसूचित जाती ३, ओबीसी ८, सर्वसाधारण प्रवर्ग १७, याशिवाय, २९ पैकी १५ महानगरपालिकांमध्ये महिलांसाठी महापौरपद आरक्षित असणार आहे.

### ➤ कोणत्या महापालिकेतील महापौरपद कोणत्या गटासाठी आरक्षित?

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका अनुसूचित जमाती, ठाणे महानगरपालिका अनुसूचित जाती, जालना महानगरपालिका अनुसूचित जाती (महिला), लातूर महानगरपालिका अनुसूचित जाती (महिला), इचलकरंजी महानगरपालिका ओबीसी, पनवेल महानगरपालिका ओबीसी, अहिल्यनगर महानगरपालिका ओबीसी (महिला), अकोला महानगरपालिका ओबीसी (महिला), उल्हासनगर महानगरपालिका ओबीसी, कोल्हापूर महानगरपालिका ओबीसी,चंद्रपूर महानगरपालिका ओबीसी (महिला), जळगाव महानगरपालिका ओबीसी (महिला), मुंबई महानगरपालिका खुला प्रवर्ग (महिला), पुणे महानगरपालिका खुला प्रवर्ग (महिला), छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका खुला प्रवर्ग, धुळे महानगरपालिका खुला प्रवर्ग (महिला), अमरावती महानगरपालिका खुला प्रवर्ग, भिवंडी-निजामपूर महानगरपालिका खुला प्रवर्ग, मालेगाव महानगरपालिका खुला प्रवर्ग (महिला), मीरा-भाईंदर महानगरपालिका खुला प्रवर्ग (महिला), नागपूर महानगरपालिका खुला प्रवर्ग (महिला), नांदेड-वाघाळा महानगरपालिका खुला प्रवर्ग (महिला), पिंपरी-चिंचवड महानगरपालिका खुला प्रवर्ग, ाशिक महानगरपालिका खुला प्रवर्ग (महिला), नवी मुंबई महानगरपालिका खुला प्रवर्ग (महिला), परभणी महानगरपालिका खुला प्रवर्ग, सांगली-मिरज महानगरपालिका खुला प्रवर्ग, वसई-विरार महानगरपालिका खुला प्रवर्ग, सोलापूर महानगरपालिका खुला प्रवर्ग.

## थोडक्यात



### पीव्ही सिंधूचा ऐतिहासिक पराक्रम!

**नुसंतारा ।** भारताची स्टार बॅटमिंटनपटू पीव्ही सिंधू सध्या इंडोनेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धा खेळण्यासाठी मैदानात उतरली आहे. या स्पर्धेतही तिच्याकडून दमदार खेळ पाहायला मिळाला आहे. या स्पर्धेतील प्री क्वार्टर फायनलमध्ये खेळताना सिंधूने लाईन होजमार्क कजेरफेल्डवर अवघ्या ४३ मिनिटात विजय मिळवला. या सामन्यात तिने लाईन होजमार्क कजेरफेल्डला पुनरागमन करण्याची संधीच दिली नाही. या सामन्यातील पहिला सेट तिने २१-१९ आणि दुसरा सेट २१-१८ च्या फरकाने जिंकून क्वार्टर फायनलमध्ये आपलं स्थान पक्क केलं. हा सामना ऐतिहासिक असण्यामागचं सर्वात मोठं कारण म्हणजे, हा तिच्या बॅडमिंटन कारकिर्दीतील महिला एकेरी प्रकारातील ५०० वा विजय ठरला.

### भारताला नवा 'फिनिशर' गवसला

**मुंबई ।** भारतीय संघाचा माजी कर्णधार एमएस धोनी हा आपल्या स्फोटक फलंदाजीसाठी ओळखला जायचा. शेवटी फलंदाजीला येऊन तुफान फटकेबाजी करून तो संघाच्या विजयात मोलाचं योगदान द्यायचा. धोनीच्या निवृत्तीनंतर भारतीय संघाला असा फलंदाज मिळालेला नाही, जो शेवटी फलंदाजीला येऊन वेगाने धावा करेल. पण रिंकू सिंग ही जागा भरून काढण्यासाठी प्रबळ दावेदार आहे. न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या टी -२० सामन्यात फलंदाजी करताना त्याने शेवटी फलंदाजीला येऊन नाबाद ४४ धावांची खेळी केली.

२४ फेब्रुवारीपर्यंत नोंदणी करता येणार

# बी. डिझाईन सीईटीच्या प्रवेश नोंदणीला सुरुवात

वृत्तसंस्था । मुंबई

**बी. डिझाईन या अभ्यासक्रमाच्या २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील सीईटीच्या प्रवेश नोंदणीला २२ जानेवारी २०२६ पासून सुरुवात करण्यात आली. या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन नोंदणीसाठी २४ फेब्रुवारी २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. गतवर्षी बी. डिझाईन सीईटीसाठी १ हजार ३२८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती.**




राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश नोंदणीला सुरुवात करण्यात आली आहे. त्यानुसार बी. डिझाईन या अभ्यासक्रमाच्या प्रवेश नोंदणीला सुरुवात करण्यात आली आहे. या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ (पान २ वर)

# नाणीज पंचायत समिती गणातून शिंदे सेनेच्या डॉ.पद्मजा कांबळे बिनविरोध

वृत्तसंस्था । रत्नागिरी

**राज्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत शिवसेनेने खाते उघडले रत्नागिरी जिल्ह्यातील नाणीज पंचायत समिती गणातून शिंदे शिवसेनेच्या उमेदवार डॉ. पद्मजा कांबळे यांची बिनविरोध निवड झाली आहे. अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशीही कोणत्याही विरोधी पक्षाचा अथवा उमेदवाराचा अर्ज दाखल न झाल्याने ही निवड निश्चित झाली.**



रत्नागिरी मतदार संघ उद्योगमंत्री उदय सामंत यांचा राजकीय बालेकिल्ला मानला जातो. यापूर्वी झालेल्या नगर परिषद निवडणुकांतही शिवसेनेचे वर्चस्व दिसून आले होते. आता जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांपूर्वीच पाली नाणीज गण बिनविरोध जिंकून सामंत यांनी आपली राजकीय ताकद पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखालीच डॉ. पद्मजा कांबळे यांना उमेदवारी देण्यात आली होती. अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी नाणीज गणाकडे सर्वांचे लक्ष लागले होते.

मात्र दुपारपर्यंत एकही अर्ज न आल्याने डॉ. कांबळे यांची बिनविरोध निवड जाहीर झाली. प्रत्यक्ष मतदानाआधीच शिवसेनेने पहिली जागा आपल्या खात्यात जमा केल्याने जिल्ह्यातील शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. डॉ. पद्मजा कांबळे यांच्या या बिनविरोध विजयामुळे रत्नागिरी जिल्ह्यातील उर्वरित पंचायत समिती आणि जिल्हा परिषद जागांवर शिंदे शिवसेनेचे पारडे जड राहण्याची शक्यता व्यक्त होत असून, विरोधकांसमोर मोठे राजकीय आव्हान उभे राहिले आहे.

# चाळीसगावात विमानाच्या हरित इंधनाचे उत्पादन होणार!

प्रतिनिधी । जळगाव

**दावोसमधील जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करार झाले आहेत. अमेरिकेतील सॅन फॅन्सिस्को येथील एका कंपनीशी करण्यात आलेल्या सामंजस्य करारानुसार, जिल्ह्यातील चाळीसगाव तालुक्यातही सुमारे १५ हजार कोटींच्या गुंतवणुकीतून सस्टेनेबल एव्हिएशन फ्युएल प्रकल्प उभारण्यात येणार आहे.**



शेतात पिकांच्या काढणीनंतर शिल्लक राहणाऱ्या टाकाऊ अवशेषांपासून विमानांसाठी वापरल्या जाणाऱ्या हरित इंधनाची निर्मिती करणारा देशातील जागतिक दर्जाचा प्रकल्प चाळीसगाव येथे उभारला जाणार आहे. राज्यात मोठी गुंतवणूक यावी, नव्या उद्योगांना चालना मिळावी आणि तरुणांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध व्हावा, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे स्वतः दावोस येथे उद्योजकांशी चर्चा करीत आहेत. याच दौऱ्यात चाळीसगाव तालुक्यात मोठा उद्योग यावा, शेतकऱ्यांच्या शेतीमालाला चांगले दर मिळावे आणि स्थानिक युवकांना रोजगार मिळावा, या उद्देशाने आमदार मंगेश चव्हाण हे देखील दावोस येथे उपस्थित राहून सातत्याने पाठपुरावा करत होते.

सस्टेनेबल एव्हिएशन फ्युएल प्रकल्पाअंतर्गत चाळीसगाव येथे अंदाजे १५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त (पान २ वर)

**चाळीसगाव तालुक्यासाठी रोजगार, उद्योग, शेती उत्पन्न आणि पर्यावरण संरक्षण, या सर्वच आघाड्यांवर क्रांतिकारी बदल घडविणाऱ्या या प्रकल्पाची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी, आव्हाने दूर करून चाळीसगावच्या अर्थकारणाला चालना देणारा हा प्रकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री गिरीश महाजन यांच्या सहकार्याने पूर्ण करू, असा विश्वास आमदार मंगेश चव्हाण यांनी व्यक्त केला आहे.**

● प्रजासत्ताकदिन, महाराष्ट्र दिनी समारंभाचे निमंत्रण

# आणीबाणीतील बंदीजनांचा होणार सन्मान

वृत्तसंस्था । मुंबई

**राष्ट्रीय आणीबाणीला विरोध करताना तुरुंगवास भोगलेल्या बंदीजनांसाठी सरकारने सन्माननिधी सुरू केल्यानंतर आता प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन आणि स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात येणाऱ्या शासकीय समारंभात निमंत्रित म्हणून सहभागी होण्याचा मान मिळणार आहे. सामान्य प्रशासन विभागाने बुधवारी याबाबतचे शासन परिपत्रक जारी केले.**




राज्यात प्रजासत्ताक दिन (२६ जानेवारी), महाराष्ट्र दिन (१ मे) आणि स्वातंत्र्यदिन (१५ ऑगस्ट) या राष्ट्रीय सणांचे कार्यक्रम ध्वजारोहण आणि ध्वजवंदन करून साजरे केले जातात. या शासकीय कार्यक्रमात लोकप्रतिनिधी आणि इतर मान्यवरांना निमंत्रित केले जाते. विशेषत: त्या त्या विभागातील स्वातंत्र्य सैनिकांनाही या समारंभासाठी निमंत्रित केले जाते. आता १९७५ ते १९७७ या दरम्यान तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी लागू केलेल्या आणीबाणीच्या काळात या निर्णयाला विरोध करताना ज्यांना कारावास भोगावा लागला, अशा व्यक्तींचा सन्मान म्हणून त्यांना जिल्हा, तालुका आणि ग्रामस्तरावर (पान २ वर)

# जळगाव महापौरपदासाठी उज्ज्वला बेंडाळे प्रबळ दावेदार

## ओबीसी महिला प्रवर्गासाठी महापौरपद आरक्षित

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव महानगरपालिकेची निवडणूक संपन्न झाल्यानंतर महापौरपदासाठी कोणत्या प्रवर्गासाठी आरक्षण निघते, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. गुरुवारी, २२ जानेवारी रोजी मंत्रालयात महापौरपदासाठी आरक्षण प्रक्रिया पूर्ण झाली. यामध्ये जळगाव महानगरपालिकेसाठी ओबीसी महिला प्रवर्ग आरक्षित करण्यात आला आहे. त्यामुळे महापौरपदासाठी भाजपकडून ओबीसी महिला उमेदवार पुढे येणार, हे स्पष्ट झाले आहे.**



जळगाव शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपने ४६ जागांवर विजय मिळवून स्पष्ट बहुमत मिळवले आहे. मित्रपक्ष शिवसेनेचे संख्याबळ केवळ २३ असल्याने महापौरपद भाजपकडे राहणार आहे. या पार्श्वभूमीवर ओबीसी महिला प्रवर्गातून निवडून आलेल्या पाच महिला नगरसेविका महापौरपदाच्या शर्यतीत पुढे येत आहेत.

राजकीय वर्तुळात ही शर्यत उज्ज्वला बेंडाळे यांच्या फायद्याची ठरत आहे. त्या यापूर्वी भाजपच्या महानगर जिल्हाध्यक्ष म्हणून कार्यरत होत्या आणि नगरसेवक म्हणून सलग दुसऱ्यांदा निवडून आल्या आहेत. संघटनात्मक कामकाजाचा अनुभव, पक्ष कार्यकर्त्यांशी संपर्क आणि नेतृत्व गुण यामुळे उज्ज्वला बेंडाळे या महापौरपदाच्या दाव्यात आघाडीवर आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचे कामकाज सुलभतेने पार पडले आहे. त्यामुळे आता महापौरपद त्यांच्याच गळ्यात पडण्याची शक्यता जास्त आहे. राजकीय तज्ज्ञांच्या मते, अनुभव संपन्न आणि संघटन कौशल्य असलेल्या नेतृत्वाला महापौरपदासाठी संधी दिली जाते, ही अपेक्षा नेहमीच असते. त्यामुळे भाजपच्या या निर्णयावर शहरातील नागरिकांचे लक्ष लागून आहे. तसेच भाजपच्या वरिष्ठ नेते नेमकी कुणाला संधी देतात ते लवकरच स्पष्ट होणार आहे. त्यामुळे येत्या काही दिवसात जळगाव महानगरपालिकेच्या १७ व्या महापौरपदी कोण विराजमान होतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### ➤ या पाच महिला आहेत दावेदार

यामध्ये माजी महानगर जिल्हाध्यक्ष उज्ज्वला मोहन बेंडाळे, मंडळ अध्यक्षा दीपमाला मनोज काळे, तसेच पहिल्यांदाच निवडून आलेल्या माधुरी अतुल बारी, विद्या मुकुंद सोनवणे व कविता सागर पाटील यांचा समावेश आहे.

# कंपनी सचिव अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा वर्षातून तीन वेळा

वृत्तसंस्था । पुणे

**बदलत्या तंत्रज्ञानाच्या काळात कंपनी सचिव (सीएस) अभ्यासक्रमाचे महत्त्व टिकून राहण्यासाठी आता अभ्यासक्रम दर पाच वर्षांऐवजी तीन वर्षांनी बदलण्याचे प्रस्तावित आहे. त्याबाबतचा प्रस्ताव केंद्रीय कंपनी व्यवहार मंत्रालयाला पाठवण्यात आला असून, कंपनी सेक्रेटरी एक्झिक्युटिव्ह एंट्रन्स टेस्ट (सीएसईईटी) ही प्रवेश परीक्षा आता वर्षातून तीन वेळा ऑफलाइन पद्धतीने घेतली जाणार आहे.**

द इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज् ऑफ इंडियाच्या (आयसीएसआय) अध्यक्षपदी पुण्याचे कंपनी सचिव पवन चांडक, तर उपाध्यक्षपदी द्वारकानाथ चेनूर यांची निवड झाली. त्यांचा एक वर्ष कार्यकाळ असणार आहे. या पार्श्वभूमीवर झालेल्या पत्रकार परिषदेत चांडक यांनी अभ्यासक्रम, परीक्षेतील बदलांबाबतची माहिती दिली. आयसीएसआयच्या पुणे विभागाचे अध्यक्ष विशाल साळुंके, उपाध्यक्ष सोहल ठाकूर, सचिव निखिल कारवा, सदस्य विशाल पाटील, समीर सिद्धेश्वर, (पान २ वर)

## संपादकीय

### 'जेन झी'कडे भाजपचे नेतृत्व

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारविरोधात जेन झीने आवाज उठवण्याचे आवाहन केले होते. जगभर आता जेन झी क्रांतीची मशाल हाती घेत असताना भारतातही तसे व्हावे, अशी राहुल यांची इच्छा असली, तरी राहुल यांच्या पक्षाची धुरा अजूनही ज्येष्ठांच्या हातात आहे. निवडणूक जिंकून द्यायला युवक आणि पदे मात्र ज्येष्ठांना, यामुळे तर काँग्रेसला कर्नाटक, मध्य प्रदेश, राजस्थान आदी राज्यांमध्ये फटका बसला. यालट, सत्तेतील महत्त्वाची पदे भाजपची ज्येष्ठ मंडळी भूषवत असली, तरी संघटनात्मक तसेच अन्य पदांवर युवक आणि मध्यमवयीन नेत्यांची वर्णी लावून भाजपने संतुलन साधले. आता मोदी हेही जेन झीला आकर्षित करत आहेत. पश्चिम बंगालमधील त्यांचे भाषण ऐकल्यास त्यात त्यांनी युवकांच्या भावनांना हात घातलेला दिसतो. दिल्लीत मोदी यांच्याविषयी आयोजित पुस्तक प्रदर्शनामागेही जेन झीच्या भावनांचा उद्रेक न होता ते आपल्याबरोबर कसे राहतील, ही व्यूहनीती होती. आता त्याचे पुढचे पाऊल म्हणून जगातील सर्वात मोठ्या राजकीय पक्षाची धुरा ४५ वर्षांच्या नितीन नबीन यांच्या खांद्यावर देण्यात आली. त्यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी झालेली बढती भाजपमध्ये एका पिढीतील बदलाचे संकेत देते. नबीन यांना नवे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नियुक्त करण्याचा भाजप पक्षश्रेष्ठींचा निर्णय केवळ एक महत्त्वाचा संघटनात्मक निर्णय नाही, तर राष्ट्रीय राजकारणाला एक स्पष्ट संदेशदेखील देतो. भाजपमध्ये नेतृत्वाचा मार्ग वय किंवा वंशावळीने नव्हे, तर कठोर परिश्रम, ऊर्जा आणि संघटनात्मक क्षमतेने ठरवला जातो, हा या निवडीमागील संदेश आहे. केवळ ४५ वर्षांच्या नबीन यांच्याकडे ही जबाबदारी सोपवून पक्षाने सिद्ध केले आहे, की भाजप भविष्यातील राजकारणावर लक्ष ठेवून तरुण नेतृत्व जोपासते. दुसरीकडे, काँग्रेसचे नेतृत्व ८३ वर्षीय मल्लिकार्जुन खरगे यांच्या खांद्यावर आहे. नबीन यांची नियुक्ती ही केवळ एक नियुक्ती नाही, तर पक्षामध्ये पिढ्यानपिढ्या होणाऱ्या बदलांचे प्रतीक आहे. १९८० मध्ये स्थापनेपासून, पक्षाने अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी आणि कुशाभाऊ ठाकरे यांसारख्या नेत्यांच्या नेतृत्वाखाली आपला वैचारिक आणि संघटनात्मक पाया मजबूत केला. त्यांच्यापाठोपाठ, नरेंद्र मोदी, राजनाथ सिंह, व्यंकय्या नायडू, अरुण जेटली, सुषमा स्वराज, नितीन गडकरी, जे. पी. नड्डा आणि अमित शहा यांच्यासह दुसऱ्या पिढीने, तर धर्मेंद्र प्रधान, भूपेंद्र यादव, देवेंद्र फडणवीस, योगी आदित्यनाथ, प्रल्हाद जोशी आणि अनुराग ठाकूर यांच्यासह तिसऱ्या पिढीने पक्षाच्या संघटनात्मक रचनेचा विस्तार केला आणि पक्षाला सत्तेत आणले. आता चौथी पिढी म्हणून भाजपने नबीन यांची निवड केली आहे. नबीन हे भाजपचे सर्वात तरुण राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. यापूर्वी अमित शहा यांनी ४९व्या वर्षी पक्षाची सूत्रे हाती घेतली होती. त्यांच्यापूर्वी नितीन गडकरी ५२व्या वर्षी अध्यक्ष झाले होते. ताज्या निवडीने भाजपने तरुणांना थेट संदेश दिला आहे, की वय हा पक्षात अडथळा नाही. नबीन हे कायस्थ समुदायातून येतात. त्यांची संख्या निवडणुकीच्या राजकारणात निर्णायक मानली जात नाही. असे असूनही, त्यांना पक्षाच्या सर्वोच्च पदावर नियुक्त केल्याने दिसून येते, की भाजप नेतृत्व निवडीमध्ये जातीच्या अंकगणितापेक्षा संघटनात्मक क्षमता आणि राजकीय समजुतीला प्राधान्य देत आहे. संघटनेत काम करणारा, जमिनीशी जोडणारा आणि निवडणूक आव्हाने समजून घेणारा कार्यकर्ता वरच्या स्थानी पोहोचू शकतो. प्रादेशिक संतुलनाच्या दृष्टिकोनातून नबीन यांची निवड महत्त्वाची आहे.

# माँसाहेब जिजाऊ महिला पतसंस्थेतर्फे सन्मान नारीशक्तीचा

## नवनिर्वाचित नगराध्यक्षा, नगरसेविकांचा हळदी-कुंकू कार्यक्रमात गौरव

प्रतिनिधी । धरणगाव

**येथील माँसाहेब जिजाऊ महिला पतसंस्थेच्या वतीने नवनिर्वाचित नगराध्यक्षा, उपनगराध्यक्षा तसेच सर्व नगरसेविकांचा सन्मान नारी शक्तीचा - सत्कार नगरसेविकांचा हा हळदी-कुंकवाचा विशेष कार्यक्रम वाणी मंगल कार्यालयात अत्यंत उत्साहपूर्ण व महिलांच्या सशक्त सहभागात पार पडला.**



**धरणगाव - नगराध्यक्षा सौ.चौधरी यांना माँसाहेब जिजाऊ यांची प्रतिमा भेट देताना संस्थेचे चेअरमन योगिता वाणी सोबत सर्व संचालिका..**

कार्यक्रमाच्या प्रारंभी माँसाहेब जिजाऊ यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून बालकवी ठोंबरे विद्यालयाच्या संचालिका शोभाताई चौधरी, ह.भ.प. विद्याताई येवले, धरणगाव नगरपालिकेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा लीलाताई चौधरी, उपनगराध्यक्षा सुरेखाताई महाजन यांची उपस्थिती लाभली. याशिवाय पतसंस्थेच्या चेअरमन योगिता वाणी, व्हा. चेअरमन चंद्रकला भोलाणे, संचालिका, सभासद व महिला नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. प्रास्ताविकात चेअरमन योगिता वाणी यांनी माँसाहेब जिजाऊ महिला पतसंस्थेच्या कार्याचा आढावा घेताना सांगितले की, महिलांचे आर्थिक सबलीकरण, स्वयंरोजगाराला चालना देणे व महिला उद्योजकतेला वित्तीय पाठबळ देणे हे संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. अवघ्या सहा महिन्यांपूर्वी स्थापन झालेल्या या पतसंस्थेने अल्पावधीत विश्वासार्ह प्रगती साधत आतापर्यंत ७० लाख रुपयांच्या ठेवी संकलनासह ५० लाख रुपयांचे कर्जवितरण केल्याचे त्यांनी नमूद केले. ही यशस्वी वाटचाल सभासद, ठेवीदार व कर्जदार यांच्या विश्वासामुळे शक्य झाल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

कार्यक्रमात नगराध्यक्षा लीलाताई चौधरी, उपनगराध्यक्षा सुरेखा महाजन यांच्यासह नगरसेविका मंदाकिनी येवले, अंजली विसावे, हेमांगी अग्निहोत्री, सोनाली कंखरे, मीना चौधरी, प्रमिला शिरसाठ, ज्योती पाटील, अक्काबाई चव्हाण, कविता पाटील व रुपाली महाजन यांचा सत्कार करण्यात आला. सत्कारप्रसंगी नगराध्यक्षा लीलाताई चौधरी यांनी महिलांच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक क्षेत्रातील योगदान अत्यंत मोलाचे असून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचा सहभाग अधिक बळकट होत असल्याचे सांगितले. अध्यक्षीय भाषणात शोभा चौधरी यांनी महिलांनी केवळ शिक्षणच नव्हे तर मुलांमध्ये सुसंस्कार रुजवणे ही आजच्या काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संचालिका शितल केले, अनिता मेहेर, डॉ. निधी अमृतकर, डिंपल चौधरी, स्वाती महाजन, वैशाली सोनार, मनीषा पाटील, सोनाली कंखरे, प्रा. डॉ. निर्मला पवार, पिग्मी एजंट देवश्री महाजन तसेच कर्मचारी मीना कोतकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

# गौरीशंकर मंदिराचा आज वर्धापनदिन विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

प्रतिनिधी । जळगाव



पूज्य सेवा मंडळ संकुलातील गौरीशंकर भगवान मंदिराचा वर्धापनदिन आज दि.२३ जानेवारी रोजी वसंत पंचमीच्या शुभ मुहूर्तावर भक्तिभावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्ताने दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळी ६.३० वाजता भगवान गौरीशंकर यांचा विधिवत अभिषेक करण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी ९.०० वाजता आरती संपन्न होईल. त्यानंतर कार्यक्रमास परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहतील. सायंकाळी ७ वाजता महिलांसाठी भजन संध्या व संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात भक्तिमय भजने व धार्मिक गीतांनी वातावरण अधिकच भक्तिरसात न्हाऊन निघते.

रात्री ९.३० वाजता महाआरतीने वर्धापनदिन सोहळ्याची सांगता होणार आहे. हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी अमर शहीद संत कंवरराम ट्रस्ट व पूज्य सेवा मंडळ, जळगाव साहिब यांच्या वतीने विशेष परिश्रम घेण्यात येत आहे. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा.

# मानवी बुध्दीमत्तेमुळे होते नवनिर्मिती : सावंत

प्रतिनिधी । जळगाव

**कृत्रिम बुध्दिमत्तेचा वेगवेगळ्या माध्यमातून प्रचंड प्रमाणात वापर होत आहे, कृत्रिम बुध्दिमत्तेमुळे निर्मिती होत असली तरी मानवी बुध्दीमत्तेमुळे नवनिर्मिती होते, असे प्रतिपादन एमकेसीएलचे मुख्य मार्गदर्शक विवेक सावंत यांनी केले.**



कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळा व पीएम उषा अंतर्गत बोध, मानवी बुद्धिमत्ता आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (कॉग्निजन ह्यूमन अँड आर्टिफिशियल इंटेलिजंट) या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेची पूर्व कार्यशाळा दिनांक २२ रोजी सिनेट सभागृहात आयोजित करण्यात आली. यावेळी मंचावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, माजी कुलगुरु डॉ. के.बी. पाटील, प्र - कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, डॉ. पवित्रा पाटील, प्रा. जे. व्ही. साळी, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, संगणकशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. राकेश रामटेके, निमंत्रक डॉ. संदीप भामरे, समन्वयक प्रा. सुरेंद्र कापसे उपस्थित होते.

कृतिशील एआयव्दारे जागतिक समस्यांचे निराकरण याविषयी विवेचन करताना विवेक सावंत कृत्रिम बुध्दीमत्तेच्या उगमापासून आतापर्यंतच्या प्रवासाची मांडणी केली. जगात झालेल्या आधुनिकीकरणात मानवी प्रक्रीयेव्दारे करण्यात आलेले काम व आता कृत्रिम बुध्दीमत्तेचा वापर करुन होत असलेली सहजता या बाबत कथन करतांना त्यांनी गुगल, चॅट जीपीटी व आता एआयचा होत असलेल्या वापराबाबत विविध दाखले दिले. आजच्या डीजीटल युगात एआय केवळ तंत्रज्ञानापुरती मर्यादीत न राहता मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात अमुलाग्र बदल घडवित आहे. विविध एआय तंत्र कशा प्रकारे कार्य करतात त्यांचा प्रत्यक्ष उपयोग काय तसेच आगामी काळात त्यांचा कसा वापर होणार आहे याची सविस्तर माहिती त्यांनी दिली. एआय वापराबाबतचे जसे फायदे आहेत तसेच त्याच्या तोटयांची माहिती देत त्यांनी ऑनलाईन फसवणुकीत वाढ झाली असल्याचे सांगितले. त्यामुळे ऑनलाईन कामकाज करतांना सावधान राहण्याची आवश्यकता असल्याचा सल्ला त्यांनी दिला. प्रास्ताविक प्रा.राम भावसार यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.अश्वीनी काकडे, प्रा.वीणा महाजन व रेवती पाटील यांनी तर आभार डॉ. संदीप भामरे यांनी मानले. यावेळी सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

## पान १ वरुन

**चाळीसगावात विमानाच्या हरित......**

तंत्रज्ञानाच्या साहाय्याने उसाचे पाचट, कापसाचे काड, सोयाबीन भूसा, तूर काड अशा कृषी अवशेषांपासून हरित इंधन तयार केले जाणार आहे. हा प्रकल्प २०२९ पर्यंत टप्प्याटप्प्याने कार्यान्वित होण्याची अपेक्षा आहे. संपूर्ण प्रकल्प १०० टक्के नवीकरणीय ऊर्जेवर आधारित असणार आहे. २४ तास वीज, १०० टक्के पाणी पुनर्वापर, ईव्ही ट्रकद्वारे वाहतूक, तसेच ईएसजी निकषांचे पूर्ण पालन केले जाणार आहे. प्रकल्पासाठी चाळीसगाव का ? - मुंबई-आग्रा महामार्ग, समृद्धी महामार्ग आणि मध्य रेल्वेच्या कनेक्टिव्हिटीमुळे चाळीसगावची लॉजिस्टिक क्षमता या प्रकल्पासाठी अत्यंत अनुकूल ठरणार आहे. त्यातून थेट ३ हजाराहून अधिक रोजगार निर्मिती होणार आहे. शेतकऱ्यांसह वाहतूक, सेवा क्षेत्र आणि पुरवठा साखळीच्या माध्यमातून हजारो अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होणार आहेत. स्थानिक तरुणांसाठी कौशल्य विकास व प्रशिक्षण कार्यक्रमही राबवले जाणार आहेत. शेतकरी उत्पादक कंपन्यांमार्फत शेतकऱ्यांकडून दीर्घकालीन कराराने शेती माल व कृषी अवशेष खरेदी केली जाणार असल्याने शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला नवे स्थैर्य मिळणार आहे.

**बी.डिझाईन सीईटीच्या......**

इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना २४ फेब्रुवारी २०२६ पर्यंत नोंदणी करता येणार आहे. सीईटी कक्षाने जाहीर केलेल्या संभाव्य वेळापत्रकानुसार या अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा ५ एप्रिल २०२६ रोजी होणार आहे. या परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज, नोंदणी वेळापत्रक आणि माहिती पुस्तिका राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या : http://www.mahacet.org या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे. या अभ्यासक्रमांसाठीची सीईटी परीक्षा राज्यातील विविध परीक्षा केंद्रांवर ऑनलाईन घेतल्या जातील. एमएचटी सीईटी, पीसीएम व पीसीबी समूह, एमबीए / एमएमएस, एमसीए, ३ व ५ वर्षीय एलएलबी, बी. एड., एमएड, बीएड-एमएड (३ वर्षीय एकत्रित अभ्यासक्रम), एम.पी.एड., एम. एचएमसीटी या अभ्यासक्रमाच्या सीईटी प्रवेश परीक्षेची नोंदणी सुरू झाली आहे. उर्वरित एएसी (फाईन आर्ट्स), डीपीएन / पीएचएन (वैद्यकीय) व नर्सिंग (परिचारिका) या अभ्यासक्रमाच्या सीईटी नोंदणीलाही लवकरच सुरुवात होणार आहे. मागील तीन वर्षांत नोंदणी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये वाढ - बी. डिझाईन अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी नोंदणी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ होत आहे. २०२३२४ मध्ये ७०२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यानंतर २०२४-२५ मध्ये ११२८ आणि २०२५-२६ मध्ये १३२८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. नोंदणीसाठी अपार आयडी व युडीआयडी बंधनकारक - विद्यार्थ्यांची अचूक माहिती उपलब्ध व्हावी, तसेच त्यांची पडताळणी करणे सहज शक्य व्हावे यासाठी राज्य सामाईक प्रवेश कक्षाने सीईटी प्रवेश परीक्षा नोंदणीसाठी ऑटोमेटेड पर्मनंट अकॅडेमिक अकाऊंट रजिस्ट्री (अपार) आयडी व दिव्यांग विद्यार्थ्यांना युनिक डिसॲबिलिटी आयडी (युडीआयडी) बंधनकारक केला आहे. विद्यार्थ्यांनी सीईटीमध्ये नोंदणी करताना अपार आयडी व युडीआयडीची नोदणी करावी यावरून विद्यार्थ्यांची पडताळणी केली जाणार आहे. ज्या उमेदवारांनी अद्याप त्यांचा अपार आयडी तयार केलेला नाही त्यांनी तो डिजीलॉकरद्वारे तयार करावा. उमेदवारांनी पुढील अद्ययावत माहिती, तपशीलवार वेळापत्रक आणि परीक्षेशी संबंधित सूचनांसाठी नियमितपणे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन सीईटी कक्षाने केले आहे.

**आणीबाणीतील बंदीजनांचा......**

आयोजित केल्या जाणाऱ्या प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन आणि स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमात सन्मानपूर्वक निमंत्रित करावे, असे शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभागाकडून विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्यासाठी काढण्यात आले आहे. संबंधित विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांनी या सूचेनानुसार योग्य ती कार्यवाही करण्याबाबत संबंधिताना अवगत करावे, असेही परिपत्रकात नमूद केले आहे. दरम्यान, राज्य सरकारने यापूर्वी आणीबाणीत कारावास भोगलेल्या बंदीजनांना महिना २० हजार रुपये मानधन देण्याचा निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी सुरु केली आहे.

**कंपनी सचिव अभ्यासक्रमाची......**

पश्चिम विभागीय समितीचे सदस्य संजय पटारे या वेळी उपस्थित होते.चांडक म्हणाले, ङ्गकंपनी सेक्रेटरी एक्झिक्युटिव्ह एंट्रन्स टेस्टमध्ये काही महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत. हे बदल जून २०२६च्या सत्रापासून लागू केले जाणार आहेत. तसेच प्रवेश परीक्षा वर्षातून तीन वेळा ऑफ लाइन पद्धतीने घेतली जाणार आहे. परीक्षेतील बदलांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संकल्पनात्मक स्पष्टता, विश्लेषणात्मक क्षमता, संवादकौशल्ये आणि व्यावहारिक समज यांचा अधिक प्रभावी विकास होणार आहे.विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमाबाबत ऑनलाइन मार्गदर्शन वर्गही उपलब्ध आहेत. आतापर्यंत दर पाच वर्षांनी अभ्यासक्रम बदलण्यात येत होता. मात्र, तंत्रज्ञानाचा प्रचंड वेग पाहता पाच वर्षांपेक्षा तीन वर्षांनी अभ्यासक्रम बदलण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यामुळे मंत्रालयाला त्याबाबत प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. नवा अभ्यासक्रम जून २०२७मध्ये लागू करण्यात येणार आहे. मात्र, त्या पुढील अभ्यासक्रम तीन वर्षांनी बदलण्यात येईल. त्याशिवाय आयसीएसआयतर्फे कंपनी सचिव अभ्यासक्रमासह मेरिटाइम रेग्युलेशन्स अँड कम्प्लायन्स मॅनेजमेंज या विषयातील पूर्ण वेळाचा एमबीए अभ्यासक्रम, काही प्रमाणपत्र अभ्यासक्रमही सुरू करण्यात आले आहेत.

# खेडी येथील श्री दादाजी दरबारात रविवारी माँ नर्मदा उत्सव

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव-भुसावळ हायवेवरील खेड़ी येथील श्री दादाजी दरबारात दि. २५ रविवार रोजी माँ नर्मदा उत्सव विविध कार्यक्रम घेवून उत्साहात साजरा होणार आहे.**

पृथ्वीवर माँ नर्मदा नदीचे माहात्म्य मोठे आहे. शास्रात दिल्याप्रमाणे गंगा नदीच्या स्नानाने जे पुण्य मिळते, तेच पुण्य नर्मदा नदीचे नाव घेतल्याने मिळते. नर्मदा नदीची परिक्रमा ही जीवाला मोक्ष प्रदान करणारी आहे. म्हणून भाविक लोक माँ नर्मदेची परिक्रमा करतात. पायी चालून, मोटार वाहनातून नर्मदा नदीची परिक्रमा आज महिला व पुरुष करीत आहे. रथसप्तमी या हिंदू धर्मातील तिथिला माँ नर्मदा उत्सव मोठ्या जल्लोषात कन्यापूजन, भंडारा करुन नदीच्या घाटावर साजरा केला जाता. या दिवशी लहान कन्यांचे पूजन, त्यांना जेवण व भेटवस्तू दिल्या जातात. श्री दादाजी दरबार खेड़ी येथे सकाळी नर्मदा आरती, नर्मदा माहात्म्य या ग्रंथाचे पारायण, नर्मदाष्टक होईल. दुपारी ४ वा. नर्मदा आरती, नर्मदाष्टक, रुद्राष्टक, नर्मदा पूजन होईल. रात्री ७.३० वा. महाआरती, स्तोत्रे, कन्यापूजन व भंडारा होईल. माँ नर्मदेला शिरा व् पुरीचा नैवैद्य दिला जातो. रात्री ९ वा. भजन होईल. या कार्यक्रमाचा लाभ भाविकांनी घ्यावा, असे श्री दादाजी दरबारच्या सेवकांनी आवाहन केले आहे.

# बाभुळगावचे विकासराव पाटील यांना राज्यस्तरीय 'डॉ. आंबेडकर समाजरत्न पुरस्कार' जाहीर

प्रतिनिधी । धरणगाव

**तालुक्यातील बाभुळगाव येथील सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार विकासराव देविदास पाटील यांना मानव सुरक्षा संस्था, मेहकर (जि. बुलढाणा) यांच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय ङ्गभारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजरत्न पुरस्कार-२०२६फ जाहीर करण्यात आला आहे. समाजहितासाठी निस्वार्थ भावनेने, प्रामाणिकपणे आणि सातत्याने कार्य करणाऱ्या व्यक्तींचा यथोचित सन्मान व्हावा, या उद्देशाने हा पुरस्कार दिला जातो.**




विकासराव पाटील यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील उपेक्षित, वंचित व दुर्लक्षित घटकांच्या समस्या प्रभावीपणे मांडत त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. सामाजिक प्रश्नांवर निर्भीडपणे आवाज उठवणे, अन्यायाविरोधात जनमत तयार करणे, तसेच शैक्षणिक, सांस्कृतिक व विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणे, ही त्यांच्या कार्याची ठळक वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्या या बहुआयामी सामाजिक योगदानाची दखल घेत मानव सुरक्षा संस्थेने त्यांची ङ्गसमाजरत्नफ पुरस्कारासाठी निवड केली आहे. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून दि.२६ जाने, २०२६ रोजी मेहकर येथील सभागृहात हा पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे. मानव सुरक्षा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गजानन इंगळे, कोषाध्यक्ष संगीता साबणकर, सचिव अरुण पांडव, सहसचिव गोविंद अग्रवाल यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत विकासराव पाटील यांना हा गौरव प्रदान केला जाणार आहे. या पुरस्काराच्या घोषणेमुळे धरणगाव तालुक्यासह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण असून, विकासराव पाटील यांचे सर्वच स्तरांतून अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे.

# फॅशन-शो ने डॉ.बेंडाळे महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनाची सांगता

प्रतिनिधी । जळगाव

**येथील डॉ.अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालयाच्या जल्लोष या तीन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलनाची सांगता आज रोजी ब्युफा पेजंट फॅशन-शो ने झाली. स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने महाविद्यालयात शिक्षक, शिक्षकेतर सहकारी व विद्यार्थिनी यांच्या सामूहिक सहभागातून गीतांची अंताक्षरी व मआपकी अदालतफहा अनोखा कार्यक्रम घेण्यात आला.**



या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.जे. पाटील, उपप्राचार्य डॉ.सत्यजित साळवे, उपप्राचार्य सौ. सुनिता पाटील यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. दुपार सत्रात विद्यार्थिनींचा कलागुण दर्शविणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये लावणी नृत्य, हिंदी मराठी गीते, देशभक्तीपर गीते, पाश्चात गीत गायन, राजस्थानी व कोळी नृत्य, एकपात्री शिवकन्या अभिनय, शिवराज्याभिषेक सोहळा, भाऊ मना सम्राट अहिराणी गीत यासह ऑपरेशन सिंदूर या देशभक्तीपर नाटिकेने विद्यार्थिनींमध्ये उत्साह संचारला.

महाविद्यालयातील कौशल्य विकास प्रशाळे अंतर्गत ब्युटी थेरपी व फॅशन डिझायनिंग या विभागातील विद्यार्थ्यांनी ब्युफा पेजंट या फॅशन शोच्या आयोजनात सहभाग घेतला. या अंतर्गत विविध प्रकारचे पेहराव व मेकअप करून रॅम्प वॉक द्वारे टाइनी टॉईज, सुमंगली, फॅशन विथ फ्युचर, वेस्टर्न मेकअप, चेंज ओव्हर, वेडिंग वियर्स या थीम प्रकारात ५० मॉडेल्स ने आपल्या कलेचे प्रदर्शन केले. या फॅशन शो मधील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. फॅशन शो च्या आयोजनात ४५ डिझायनर आर्टिस्ट यांनी डॉ. शिला राजपूत यांच्या मार्गदर्शनात रेश्मा नारखेडे ,रूपाली भोळे व वृषाली महाजन यांनी या फॅशन शो यशस्वी केला. महाविद्यालयाच्या या तीन दिवसीय स्नेहसंमेलन आयोजनासाठी शिक्षक व शिक्षकेतर सहकारी यांच्या विविध समित्या गठित करण्यात आल्या होत्या.

स्नेहसंमेलन यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्हि. जे.पाटील, उपप्राचार्य डॉ.पी. एन. तायडे, उपप्राचार्य डॉ.सत्यजित साळवे, उपप्राचार्य सौ. सुनीता पाटील यांच्या मार्गदर्शनात स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. दीपक किनगे, कलामंडळ प्रमुख डॉ. अनिता कोल्हे, समन्वयक प्रा.एन.जे. बावस्कर यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर सहकारी यांचे सहकार्य मिळाले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.- ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✲ **कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी** (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# तोरखेडा-लोहगावदरम्यान पूल उभारण्याची गावकऱ्यांची मागणी

## मध्यप्रदेश- गुजरात जोडले जाणार तर धुळे, दोंडाईचा, शिंदखेडा अंतर कमी होऊन व्यापारी वर्गाला होणार फायदा

प्रतिनिधी । शहादा

**शहादा तालुक्यातील तोरखेडा ते लोहगाव दरम्यान तापी नदीवर नवीन पूल उभारण्याची मागणी गेल्या २१ वर्षांपासून सातत्याने केली जात आहे. मात्र दुर्लक्ष झाल्याने नंदुरबार व धुळे या दोन्ही जिल्ह्यातील गाव कारभारी व ग्रामस्थांची बैठक तापी नदीकाठावर झाली. यात पूल उभारणीसाठी लेखी प्रस्ताव तयार करण्यात आला असून दोन्ही जिल्ह्यातील जबाबदार लोकप्रतिनिधी व शासकीय स्तरावर पाठपुरावा करण्याबाबत चर्चा झाली.**

हा पुल जर झाला तर मध्यप्रदेश, गुजरात जोडले जाणार आहे. धुळे, दोंडाईचा, शिंदखेडा अंतर कमी होईल आणि तापी च्या लोहगांव किणारपट्टी वरील सर्व गावांची बाजार पेठ तोरखेडा असल्याने या ठिकाणी मोठी मच्छी मार्केट असल्याने व्यापारी वर्गाला फायद्याचे ठरणार आहे.

आता नवीन होणाऱ्या रेल्वे मार्गामुळे इंदोर ,धुळे साठी फारच फायदेशीर होईल व संपूर्ण तापी थडी परिसरात दळण वळण सोईचे होणार आहे. इंधन, वेळ बचत होणार आहे तसेच आदिवासी व विद्यार्थ्यांनाही मोठ्या प्रमाणावर लाभ होणार आहे.

तोरखेडा ते लोहगाव पुल उभारण्याबाबत तत्कालीन कामगार मंत्री डॉ. हेमंत देशमुख यांनी या दोन्ही जिल्ह्यांतील दळणवळणासह शेती, उद्योग व्यापार, दैनंदिन वापर, यासाठी येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी सर्व्हे करून पूल बांधकामाचा प्रस्ताव तयार केला. परंतु राज्य सरकार बदलल्याने तो प्रस्ताव मागे पडला.

सध्या तोरखेडा-लोहगाव दरम्यान पूल नसल्याने ग्रामस्थांना प्रवासासाठी आर्थिक भुर्दंड व फेऱ्यामुळे वेळेची नासाडी होते.



➢ तोरखेडा ते लोहगाव या गावांदरम्यान तापी नदीवर पुलाचे बांधकाम गरजेचे आहे. पूल झाल्यास नंदुरबार, धुळे व मध्य प्रदेश राज्य या सर्वांना जोडणारा तो अत्यंत महत्त्वाचा सेतू ठरणार आहे. परिणामी औद्योगिक, व्यापार, शेतमाल वाहतूक व दळणवळण हे सर्व सुकर होईल, अशी माहिती लोहगाव पूल निर्माण संघर्ष समितीचे प्रमुख शांतीलाल पाटील व तोरखड्याचे सरपंच मनीष गरूड यांनी दिली.

**शिरपूर ते सारंगखेडा या ४० कि.मी. अंतरात कुठेही या नदीवर पूल नाही. नंदुरबार जिल्ह्याच्या पश्चिम भागाचे लोक सारंगखेडा व प्रकाशा पुलाचा वापर करतात. मात्र पूर्व भागातील ग्रामस्थांना फेऱ्याने सारंगखेडा मार्गे अथवा शिरपूर मार्गे धुळे, नाशिक व मुंबई या ठिकाणी जावे लागते. वेळोवेळी दोन्ही गावांसह परिसरातील ग्रामस्थ, गाव कारभारी पुलासाठी पाठपुरावा करत आहेत. मात्र लक्ष कोण देणार, असा प्रश्न उपस्थित होतो. यासाठी पूल उभारणीसाठी संघर्ष समिती स्थापन करण्यात आली आहे.**

## थोडक्यात

### किरकोळ वादातून वृद्धाला मारहाण

धुळे । तालुक्यातील रतनपुरा गावाच्या बस स्थानकाजवळ एका ६० वर्षीय वृद्धाला विनाकारण शिवीगाळ करत लोखंडी रॉडने मारहाण केल्याची घटना रविवारी घडली. याप्रकरणी धुळे तालुका पोलिसात सोमवारी संशयित आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बोरकुंड येथील रहिवासी कामगार महारू बारकू माळी (वय ६०) यांना दि. १८ रोजी दुपारी ४ वाजेच्या सुमारास गावातील भूषण संभाजी चौधरी (रा. रतनपुरा) याने लोखंडी रॉडने फिर्यादीच्या डाव्या हातावर जोरात प्रहार केला, ज्यामुळे त्यांना गंभीर दुखापत झाली आहे. या घटनेनंतर फिर्यादीने पोलिस ठाण्यात धाव घेऊन आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### इग्नाईट कन्व्हेशनचे उद्या आयोजन

धुळे । महाराष्ट्र शासनाच्या उद्योग संचालनालयामार्फत शनिवार, दि. २४ रोजी सकाळी ९ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, नियोजन सभागृहात महा निर्यात इग्नाईट कन्व्हेशनचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील उद्योजक, नवउद्योजक तसेच निर्यात इच्छुकांनी कन्व्हेशनला उपस्थित राहावे, असे आवाहनह जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक यांनी केले आहे.

### धार्मिक गटात तेढ निर्माण करणारे व्हिडीओ प्रसारित; एकास अटक

प्रतिनिधी । धुळे

सोशल मिडीयावर गुन्हेगारीचे उदात्तीकरण व दोन धार्मिक गटांत तेढ निर्माण होईल, अशा प्रकारचे लाईव्ह व्हिडीओ प्रसारित करणाऱ्यांवर पोलिसांनी कारवाई केलीय आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने इन्स्टाग्रामवरील संबंधीत अकाऊंटधारकाचा शोध घेत त्याला ताब्यात घेतले आहे.

पोलिसांच्या सोशल मिडीया देखरेखी दरम्यान आक्षेपार्ह व समाजात तेढ निर्माण करणारा लाईव्ह व्हिडीओ आढळून आला. तपासात सदर अकाऊंटधारक प्रेम ऊर्फ प्रेमचोपडा प्रकाश सोनवणे (वय २०, रा. रामदेव बाबा नगर, धुळे) याने त्याचे साथीदार विक्की मोरे, वरधान गोयर व लोकेश गोयर यांच्यासह हा व्हिडीओ केल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी आझादनगर पोलिस ठाण्यात बीएनएस कलम ३५३ (२), ३५२, २९९, ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी प्रेम सोनवणे यास ताब्यात घेतले. उर्वरित तीन आरोपींचा शोध सुरू आहे. दरम्यान, सोशल मिडीयावर भडकाऊ, प्रक्षोभक किंवा समाजविघातक मजकूर पोस्ट अथवा शेअर करू नये, अन्यथा कठोर कारवाई करण्यात येईल, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# पिता-पुत्र हत्याकांडातील मुख्य आरोपीला पोलिस कोठडी

प्रतिनिधी । धुळे

**शहरातील देवपूर परिसरात रावसाहेब पाटील पिता-पुत्राच्या दुहेरी हत्याकांड प्रकरणातील मुख्य आरोपी बाजीराव ऊर्फ सुभाष सजन पवार याला अखेर पश्चिम देवपूर पोलिसांनी अटक केली आहे.**



सर्वोच्च न्यायालयाने जामीन फेटाळल्यानंतर आणि महिनाभर फरार राहिल्यानंतर, न्यायालयाने त्याला दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. या खटल्यातील मुख्य आरोपी बाजीराव पवार याचा अटकपूर्व जामीन अर्ज औरंगाबाद उच्च न्यायालयाने फेटाळला होता. त्यानंतर गेल्या दीड वर्षापासून तो सर्वोच्च न्यायालयाकडून मिळालेल्या तात्पुरत्या अंतरिम जामिनावर बाहेर होता. मात्र, तपासात सहकार्य करा या अटीचे त्याने पालन केले नाही. पोलिसांनी याबाबतचा अहवाल सादर केल्यानंतर १९ डिसेंबर २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने त्याचा जामीन अर्ज नामंजूर केला. जामीन फेटाळल्यानंतरही बाजीराव पवार पोलिसांसमोर शरण आला नाही. दरम्यान, दि. २० जानेवारी रोजी तो सत्र न्यायालयात हजर झाला असता न्यायालयीन कामकाज संपताच पश्चिम देवपूर पोलिसांनी त्याला अटक केली. न्यायालयाने त्याची २२ जानेवारीपर्यंत पोलिस कोठडीत रवानगी केली आहे.

# भाषेबद्दल अभिमान बाळगा, भाषा ही आपल्या अस्मितेचा भाग : डॉ. माहेश्वरी गावित

प्रतिनिधी । तळोदा

**भाषेचे संवर्धन, जतन हे महिलांनी मोठ्या प्रमाणात केले आहे. मावची बोली ही नवापूर, साक्री, दहिवेल भागात मोठ्या प्रमाणात बोलली जाते. आदिवासी समाजातील लोकगीते मावची भाषेत देखील आहेत. जेवढी बोली बोलणार, तेवढी भाषा जिवंत राहील. आपल्या भाषेबद्दल अभिमान बाळगा, भाषा ही आपल्या अस्मितेचा भाग आहे. बोली भाषा टिकण्यासाठी भाषेचे दस्तऐवज, संगोपन करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन प्राचार्या डॉ. माहेश्वरी गावित यांनी केले.**




मराठी भाषा विभाग, भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्याच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा राबविण्यात येत असून त्यानुसार येथील वरिष्ठ महाविद्यालयात बोलींचा जागर हा कार्यक्रम बुधवारी (ता. २१) आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी त्या बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य हेमंत दलाल होते. बोली भाषा तज्ञ मार्गदर्शक म्हणून प्रा. पुष्पा गावित प्राचार्या डॉ. माहेश्वरी गावित (मावची बोली), प्रा. बन्सीलाल भामरे (पावरा बोली) उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून भाषा संचालनालयाचे सहाय्यक संचालक ह. म. सूर्यवंशी, पर्यवेक्षक संदीप साबळे, अनुवादक नामदेव कोळी, आस्थापना सहाय्यक रुपेश मोरे, कॉलचे ट्रस्टचे उपाध्यक्ष रोहित माळी, संचालक उखा पिंपरे आदी उपस्थित होते. प्रतिमापूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी प्रा. पुष्पा गावित यांनी सांगितले की, भिल्ल बोली भाषा म्हणजेच देहवाली भाषा होय. देहवाली भाषेत अनेक शब्द राजस्थान, गुजरात राज्यातून आले आहेत. आपले साहित्य तेव्हाच समृद्ध होईल जेव्हा बोली भाषा टिकून राहतील असे सांगून त्यांनी मशिबलीफ यावर कविता सादर केली. आणि शिबली आदिवासी समाजात कोणकोणत्या कामात येते व किती महत्वपूर्ण याबद्दल माहिती दिली. प्रा. बन्सीलाल भामरे यांनी सांगितले की, पावरा समाज हा फक्त पावगड पर्यंत मर्यादित नसून पावरा समाजाचा इतिहास फार विस्तृत आहे. पावरी बोली भाषेत गुजराती, राजस्थानी, नेमाडी भाषेचे शब्द जास्त प्रमाणात दिसतात.

ग्रंथदिंडी, शोभायात्रा - यावेळी कार्यक्रमाच्या सुरुवातीला ग्रंथदिंडी, शोभायात्रा काढण्यात आली. दिंडी स्मारक चौक मार्गाने परत महाविद्यालयात पोहचली. शोभायात्रेत पारंपरिक लोकनृत्य, लोकसंगीत, लोकगायक पथकांचा समावेश होता. ढोल आणि पारंपारिक वाद्यसंगीतासह नृत्याविष्कार करत निघालेली शोभायात्रा लोकांचे आकर्षण ठरली.

# ॲपेरिक्षा उलटल्याने १३ जखमी; चालकाविरूध्द गुन्हा

प्रतिनिधी । नंदुरबार

**भरधाव ॲपेरिक्षा उलटल्याने अपघातात १३ जण जखमी झाल्याची घटना सिंगपूर येथे घडली. याप्रकरणी रिक्षा चालकाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



तळोदा तालुक्यातील काही जणांना ॲपेरिक्षा (क्र. जी.जे.०७ एटी ०४०७) बसूवन शहादा तालुक्यातील नवागाव येथू तळोदा, बोरद, तुळाजामार्गे घेवून चालक जात होता. यावेळी भरधाव वेगात असतांना तळोदा तालुक्यातील सिंगसपूर गावाच्या उतारावरील वळणावर ॲपेरिक्षा उलटली या अपघातात दिलवर रामा कोळी रा. इच्छागव्हाण ता. तळोदा, नेहरू रित्या पाडवी, वसंतीबाई जयवंत पाडवी, कमलीबाई धनाजा पाडवी रा.पाठळी ता. तळोदा व इतर ९ असे एकूण १३ प्रवासी जखमी झाले आहेत. याबाबत हे.कॉ. भिमसिंग सत्तार ठाकरे यांनी तळोदा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

त्यानुसार ॲपेरिक्षा चालकाविरूध्द भान्यासंचे कलम २८१, १२५, (ए), ३२४, (४) मोटरवाहन कायदा कलम १८४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोना राजु जगताप करीत आहेत.

# विहिरीत उडी घेवून महिलेची आत्महत्या

प्रतिनिधी । नंदुरबार

पती व मुलाकडून होणाऱ्या नेहमीच्या त्रासाला कंटाळून महिलेने विहिरीत उडी घेवून आत्महत्या केल्याची घटना सुतारे येथे घडली. याप्रकरणी नंदुरबार तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नंदुरबार तालुक्यातील सुतारे येथील मंजुळाबाई भिमराव पवार (वय ४९) या महिलेशी पती भिमराव पवार व मुलगा कैलास पवार हे दोघे नेहमी भांडण करायचे तसेच नोव्हेंबर महिन्यामध्ये महिलेला मारहाण केली होती. या त्रासाला कंटाळून शेतातील विहिरीच्या पाण्यात उडी घेवून आत्महत्या केली.

# तळोदा तालुक्यातील १० गावांना पाण्याच्या टँकरचे वितरण



प्रतिनिधी । तळोदा

**नंदुरबार जिल्हा परिषद पाणीपुरवठा नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत तळोदा तालुक्यातील एकूण दहा गावांना आमदार राजेश पाडवी यांच्या विशेष प्रयत्नातून पाण्याचे टँकर वितरित करण्यात आले.**

उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे तालुक्यातील अनेक ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होत असते, नागरिकांना दररोज पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन ग्रामीण जनतेला तात्काळ दिलासा मिळावा, या उद्देशाने आमदार राजेश पाडवी यांच्या विशेष पुढाकारातून व जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाच्या नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत ही व्यवस्था करण्यात आली आहे. आमदार राजेश पाडवी यांच्या विशेष प्रयत्नातून सोमावल, राजवीहीर, मोदलपाडा, बोरद, आमलाड, मोड, कढेल, कळमसर, मोहिदा, प्रतापपूर व चिनोदा या ग्रामपंचायतींना पाण्याचे टँकर सुपूर्द करण्यात आले. सदर पाण्याचे टँकर आमदार राजेश पाडवी यांच्या निवासस्थानी संबंधित ग्रामपंचायतींच्या प्रतिनिधींना औपचारिकरित्या प्रदान करण्यात आले.

या उपक्रमामुळे संबंधित गावांतील नागरिकांची पिण्याच्या पाण्यासाठी होणारी गैरसोय मोठ्या प्रमाणात दूर होणार असून, उन्हाळ्याच्या काळात होणारा पाण्याचा गंभीर प्रश्न काही अंशी सुटणार आहे. पाणीटंचाईच्या काळात लोकप्रतिनिधींनी घेतलेल्या या तत्काळ निर्णयामुळे ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण असून ग्रामस्थांनी आमदार राजेश पाडवी यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

यावेळी सर्व संबंधित ग्रामपंचायतींचे सन्माननीय सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच जिल्हा महामंत्री बळीराम पाडवी,विजय राणा, वीरसिंग पाडवी, विठ्ठल बागले, प्रवीण पाडवी आदी मान्यवर उपस्थित राहून त्यांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले. आगामी काळातही तळोदा तालुक्यातील पाणीटंचाईग्रस्त गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरळीत राहावा यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येतील, असे आश्वासन यावेळी आमदार राजेश पाडवी यांनी दिले.

# प्रशासनाच्या उदासीनतेने शेकडो गावात पोलीस पाटीलच नाहीत

## • भरती प्रक्रिया त्वरित राबवावी या मागणीसाठी बिरसा आर्मीने दिले निवेदन

प्रतिनिधी । तळोदा

**नंदुरबार जिल्ह्यात गेल्या सात वर्षापासून शेकडो गावात पोलीस पाटील नाही. पोलीस पाटील भरती त्वरित राबवावी. यासाठी बिरसा आर्मीने जिल्हाधिकारी व प्रांताधिकारी यांना तिसरे स्मरण निवेदन दिले आहे.**

निवेदनात म्हटले आहे की, जिल्ह्यात गेल्या सात वर्षापासून पोलीस पाटील भरती रखडल्याने शेकडो गावे पोलीस पाटलनांविना आहेत. दीड वर्षापूर्वी पदभरती कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता. परंतु, काही दिवसातच तोही रद्द करण्यात आला. सात वर्षापासून आहे त्या पोलीस पाटलावरच शेजारच्या गावांची जबाबदारी दिली जात असल्याने त्यांच्यावर अतिरिक्त ताण आहे. पोलिस पाटील हा महसूल व पोलिस यांच्यातील महत्त्वाचा दुवा असतो.

गाव पातळीवरील घटना, घडामोडी, तंटे, वाद गावातशी सोडविण्याची व इतर महत्वाची कामे केली जातात. तळोदा तालुक्यात अमोनी, लक्कडकोट, रापापूर, राजविहीर, धवळीविहीर, मेंढवढ, नवागाव, सलसाडी, बोरद, लाखापूर, बुधावली, राणीपूर, रांझणी, आमलाड, मोड अशा एकूण ३७ महसूली गावात अद्यापही पोलीस पाटील नाहीत. संघटनेमार्फत गेल्या चार वर्षापासून सतत पाठपुरावा करत असतांना देखील सरकार, प्रशासन दुर्लक्ष करतांना निदर्शनास येत आहे, हे दुर्दैव आहे. प्रशासन एवढे उदासीन का? असा प्रश्न उपस्थित करत पोलीस पाटील पदभरती प्रक्रिया त्वरित राबविण्याची मागणी केली आहे.

निवेदनावर अक्कलकुवा तालुकाध्यक्ष मानसिंग पाडवी, धडगाव तालुकाध्यक्ष अजय वळवी, तळोदा संघटक कालूसिंग पावरा, पाल्हाबार-रापापूर शाखाध्यक्ष शिवाजी तडवी, सल्लागार गणेश पाडवी, सायसिंग वळवी, कोठ्या पावरा आदी पदाधिकाऱ्यांच्या सह्या आहेत.

➢ पोलीस पाटील हा महसूल व पोलीस यांच्यातील महत्वाचा दुवा असतो. गाव पातळीवरील घटना, तंटे, वाद गावातच सोडवण्यासाठी व कायदा, सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस पाटील यांची भूमिका महत्वाची असते. परंतु, जिल्ह्यात गेल्या सात वर्षांपासून संबंधित प्रशासनाच्या उदासीनता व दुर्लक्षतेमुळे शेकडो गावे पोलीस पाटीलविना आहेत. त्यामुळे भरती प्रक्रिया त्वरित राबवावी.

**- राजेंद्र पाडवी,**
**संस्थापक अध्यक्ष** बिरसा आर्मी

# मनरेगा कंत्राटी कर्मचाऱ्यांचा आजपासून संपाचा इशारा

## जिल्हा परिषद सीईओंना देण्यात आले संघटनेकडून निवेदन

प्रतिनिधी । जामनेर

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत (मनरेगा) कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचा मोठा वर्ग असून, शासनाने सर्वेक्षण अभियान आणि ग्रामीण आरोग्य केंद्रावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांना आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी संरक्षण दिले असताना, मनरेगा अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांबाबत अद्याप कोणताही ठोस निर्णय न घेतल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष आहे.**



मनरेगा अंतर्गत राज्य स्तरापासून ते पंचायत समिती स्तरापर्यंत एफआरएएस समन्वयक, कार्यक्रम व्यवस्थापक, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, तांत्रिक अधिकारी, डेटा एंट्री ऑपरेटर आणि शिपाई अशा विविध पदांवर कर्मचारी गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत आहेत.

ग्रामीण भागातील गरजू हातांना काम मिळवून देण्यात आणि महाराष्ट्र राज्याला देशामध्ये पहिल्या क्रमांकावर नेण्यात या कर्मचाऱ्यांचा मोठा वाटा आहे.

मात्र, शासन सेवेत नियमित कर्मचारीप्रमाणेच काम करूनही त्यांना शासन सेवेत नियमित करावे, ही मुख्य मागणी असून, याबाबत जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे. दहा दिवसांत निर्णय न झाल्यास २३ जानेवारी २०२६ पासून राज्यव्यापी कामबंद आंदोलन करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

मनरेगा कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून, नियमित समावेशन इतर योजनांमधील कर्मचाऱ्यांप्रमाणेच मनरेगामधील सर्व कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासन सेवेत नियमित करावे, खाजगी कंपन्यांना हद्दपार करा, ५-२ इनोव्हेटेक (५-२ इनोव्हेटेक) कंपनीमार्फत होणारी अवैध भरती प्रक्रिया तात्काळ थांबवून ही कंपनी रद्द करावी, समान काम समान वेतन: सर्व कर्मचाऱ्यांची नियुक्ती राज्य निधी असोसिएशन (सोसायटी) मार्फत करून त्यांना समान काम समान वेतन धोरण लागू करावे, स्वतंत्र यंत्रणा : इतर विभागांप्रमाणे मनरेगाची स्वतंत्र यंत्रणा तयार करून पदनिहाय आकृतीबंध निश्चित करावा, आदी प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

# गुरु तेगबहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी दिनानिमित्त विद्यार्थ्यांची रॅली




प्रतिनिधी । चोपडा

**हिंद-की-चादर श्री गुरु तेगबहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समारंभाच्या अनुषंगाने नगर परिषद संचलित पी.एम. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले म्युनिसिपल हायस्कूल, चोपडा येथील विद्यार्थ्यांनी शहरात जनजागृती रॅली काढली.**

या रॅलीचे उद्घाटन चोपडा नगर परिषदेचे शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक कार्य समितीचे सभापती अमोल साहेबराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भारतीय जनता पक्षाचे नवनिर्वाचित नगरसेवक गजेंद्र जयस्वाल, नगरपरिषदेचे उपमुख्याधिकारी संजय मिसर, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले म्युनिसिपल विद्यालयाचे मुख्याध्यापक दीपक पवार, तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते. रॅलीदरम्यान विद्यार्थ्यांनी घोषणा व फलकांच्या माध्यमातून श्री गुरु तेगबहादूर साहिबजी यांच्या त्याग, बलिदान, धार्मिक सहिष्णुता व मानवतेचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविला. कार्यक्रम शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## थोडक्यात

### वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार महिला ठार

**भुसावळ ।** भरधाव वाहनाने दुचाकीला धडक दिल्यामुळे पुष्पाबाई काशीनाथ पाटील (रा. फुलगाव, ता. भुसावळ) यांचा मृत्यू झाला. या अपघातात त्यांचा मुलगा महेंद्र पाटील हा जखमी झाला. हा अपघात २० जानेवारी रोजी साकेगावजवळील वाघूर नदीच्या पुलावर झाला. याप्रकरणी नशिराबाद पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फुलगाव येथील महेंद्र पाटील हे आई पुष्पाबाई यांच्यासह दुचाकीने जळगावकडे येत असताना भरधाव वाहनाने दुचाकीला धडक दिली. यात पुष्पाबाई यांचा मृत्यू झाला. तसेच महेंद्र पाटील हे जखमी झाले. याप्रकरणी जखमीच्या फिर्यादीवरून नशिराबाद पोलिस ठाण्यात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास प्रशांत तिरणारे करीत आहेत.

### देवराम नगरात घरात आग लागून साहित्य खाक

**जळगाव ।** बंद असलेल्या घरामध्ये आग लागून कॉट, सोफा, गादी, कपडे यासह संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाले. ही घटना २० जानेवारीला मध्यरात्री देवराम नगरात घडली. कोल्हे हिल्स रस्त्यावरील देवराम नगरमधील रहिवासी जितेंद्र गणपत लोखंडे यांचे घर आहे. १५ दिवसांपासून ते घर बंद होते. २० रोजी मध्यरात्री घरात आग लागून धूर येत असल्याचे लक्षात येताच शेजारील मंडळींनी तालुका पोलिस ठाणे व अग्निशमन दलाला माहिती दिली. त्यावेळी बंब तेथे दाखल झाला. देवीदास सुरवाडे, रोहिदास चौधरी योगेश पाटील, ऋषभ सुरवाडे, विठ्ठल पाटील, शुभम सोनवणे यांनी पाण्याचा मारा करून आग विझविली. या आगीमध्ये कॉट, सोफा, गादी, कपडे पडदे, डबे व इतर साहित्य खाक झाले. १५ दिवसांपासून घर बंद असल्याचे मालकांनी अग्निशमन दलाला सांगितले.

# मुक्ताईनगरात धर्मबीज उत्सव भक्तीपूर्ण वातावरणात साजरा

प्रतिनिधी । मुक्ताईनगर

**येथील नाथजोगी समाजातर्फे दि.२० रोजी धर्मबीज उत्सव अत्यंत भक्तिपूर्ण वातावरणात उत्साहाने मिरवणूक काढून गोरक्षनाथ, नवनाथ यांचा जयघोष करीत, भक्तिगीतांवर वाजत गाजत जल्लोषाने साजरा केला.**



दि.२० रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्षा देवयानी शिरसाठ व त्यांचे पती माजी नगरसेवक निलेश शिरसाठ यांच्या हस्ते गोरक्षनाथाची आरती करून पालखीतील नवनाथ प्रतिमेचे पूजन केले. भगवान मोरे यांनी विधिवत पौरहित्य केले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला आघाडी प्रदेशाध्यक्षा ॲड. रोहिणी खडसे, नगरसेवक गणेश टोंगे, बबलू कोळी, बंटी जैन, दीपक चिंचोले, माजी सरपंच ललित महाजन, काँग्रेसचे प्रदेश ओबीसी सेल प्रमुख डॉ. जगदीश पाटील, मानवाधिकार संघटनेचे जिल्हाध्यक्ष मोहन मेढे, वंजारी समाज जिल्हाध्यक्ष कैलास वंजारी, नवनाथ जोगी समाज मंडळ अध्यक्ष मोतीलाल जोगी, कार्यक्रमाचे आयोजक रमेश जोगी, संदीप जोगी, राजमेश जोगी आदी मान्यवरांनी देखील पालखी पूजन केले. यावेळी वाजत गाजत, नाचत, भक्तिगीतांसह जयघोष करत नवनाथांची पालखी नगरपंचायत मार्गे प्रवर्तन चौक ते बोदवड रस्त्यावरील कार्यक्रम स्थळी पोहोचली. गोरक्षनाथ मच्छिंद्रनाथ संत मुक्ताबाई या वेशभूषेतील बाल भक्तांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. समाज बांधवांसह शहरातील अनेकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. नऊ दिवस नवनाथ पोथीचे पारायण करण्यात आले. राजकन्या जोगी यांनी रसदार विश्लेषणात्मक वाणीने श्रोत्यांसमोर नवनाथ पोथीचे वाचन केले. धर्मबीज उत्सव सोहळा यशस्वी करण्यासाठी रमेश नाथ जोगी,विठ्ठलराव जोगी, वसंत जोगी, मोतीलाल जोगी,संदीप जोगी, राजमेश जोगी, भावेश जोगी, दत्ता जोगी, राजू जोगी,गणेश जोगी, किशोर जोगी, आकाश जोगी, आदी समाज बांधवांनी परिश्रम घेतले.

# कठोरा येथे विठ्ठल आफ्रो बीसीआयकडून बायोचारनिर्मितीवर मार्गदर्शन व प्रात्यक्षिक

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील कठोरा येथे विठ्ठल आफ्रो बीसीआय संस्थेच्यावतीने शेतकऱ्यांना सुधारित कापूस आदर्श पद्धत प्रकल्पांतर्गत मार्गदर्शन करण्यात आले व प्रात्यक्षिकही करून दाखविण्यात आले.**



संस्थेचे कृषिमित्र कपिल पाटील यांनी बायोचारनिर्मितीविषयी माहिती देऊन बायोचार करण्याचे फायदे विषद करून जमिनीचा सेंद्रिय कर्ब वाढून उत्पादकता कशी वाढते ते सांगितले.यामुळे जमिनीतील जिवाणू वाढीसाठी पोषकता निर्माण होऊन कमी खर्चात शेतकरी चांगले खत निर्मिती करू शकतो. माहितीसह शेतकऱ्यांशी चर्चा करून यावेळी त्यांनी प्रात्यक्षिकही करून दाखवले. यावेळी गावातील प्रगतिशील शेतकरी बांधव व कृषी सेवा केंद्र चालक आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक कृषी मित्र कांतिलाल पाटील यांनी केले तर दीपक मोरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. सरिता बाविस्कर व सहकाऱ्यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.

# चोपड्यात ६ फेब्रुवारीपासून रोटरी उत्सव व्यवसाय आणि मनोरंजनाला येणार उधाण

प्रतिनिधी । चोपडा

**येथील रोटरी क्लब ऑफ चोपडा या ५५ वर्षांपासून कार्यरत असलेल्या क्लबच्या माध्यमातून यंदा ६ ते ९ फेब्रुवारी दरम्यान रोटरी उत्सव २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. रोटरी क्लब ऑफ चोपडा गेल्या अनेक वर्षांपासून शहर व तालुक्यात विविध समाजोपयोगी सेवाभावी व प्रबोधनात्मक कार्यक्रम राबवत आहे.**




या कार्यक्रमांना व्यवसाय, मनोरंजनाची जोड देत गेल्या सहा वर्षापासून रोटरी क्लबतर्फे रोटरी उत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. जीवनाचा आनंद रंगे, रोटरी उत्सवाच्या संगे, हा विचार डोळ्यासमोर ठेवत या उत्सवाची सुरुवात करण्यात आली आहे. अरुणनगर जवळील बी. एड. कॉलेज समोरील मैदानावर होणाऱ्या या उत्सवात व्यवसाय, कृषी उत्पादने, कलाकुसरीच्या वस्तू, कपडे, वाहने, विविध खाद्यपदार्थांची विक्री करणारे अनेक स्टॉल असणार आहेत. तसेच मनोरंजनासाठी सांस्कृतिक कार्यक्रमांचे देखील आयोजन केले जाणार आहे. याच परिसरात विविध खेळणी असणारा प्ले झोनदेखील असणार आहे. उत्सवाच्या कालावधीत शेतकरी मेळावा घेण्यात येणार आहे, अशी माहिती क्लबचे अध्यक्ष आशिष जयस्वाल यांनी यावेळी दिली. यावेळी मंचावर प्रकल्प प्रमुख संजय बारी, सहप्रकल्प प्रमुख लीना पाटील, विपुल छाजेड, आदित्य अग्रवाल, चंद्रशेखर साखरे, मानद सचिव विश्वास दलाल, कोषाध्यक्ष निखिल सोनवणे हे उपस्थित होते. तत्पूर्वी आशिष जयस्वाल, संजय बारी, निखिल सोनवणे, आदित्य अग्रवाल, लीना पाटील यांनी उत्सव मैदानाचे विधिवत भूमिपूजन केले. यावेळी रोटरी सदस्य उपस्थित होते.

### अमय पालीवाल हिंदी परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण

जळगाव । चोपडा



तालुक्यातील लासूर येथील रहिवाशी व चोपडा येथील प्रताप विद्या मंदिराचा विद्यार्थी अमय विशाल पालीवाल याने महात्मा गांधी राजभाषा हिंदी प्रचार संस्था पुणेतर्फे आयोजित अखिल भारतीय हिंदी ओलंपियाड बोधिनी परीक्षा प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण केली. त्याचा या यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक तसेच शिक्षक वृंद व लासूर येथून अभिनंदन होत आहे.

# कोठारी महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी विकास महाजन

जळगाव । अमळनेर

तालुक्यातील कळमसरे येथील शारदा माध्यमिक विद्यालय व एन.एम. कोठारी कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक तथा प्राचार्यपदी विकास प्रल्हाद महाजन यांची नियुक्ती झाली. यावेळी माळी समाज पंच मंडळ व समस्त माळी समाजबांधवांनी त्यांचा श्रीराम मंदिरात निवडप्रसंगी सत्कार केला.

विकास महाजन हे शिस्त व विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून त्यांची गावासह परिसरात ओळख आहे. याप्रसंगी सत्काराला मुरलीधर चौधरी, सुदाम चौधरी, अशोक चौधरी, पत्रकार बाबुलाल पाटील, गजानन पाटील, नथु चौधरी, सुकदेव महाजन, नितीन चौधरी, पो-लीस पाटील गोपाल महाजन, विजय चौधरी, संजीव महाजन, चुनीलाल महाजन, कैलास महाजन, डॉ. कपिल महाजन, प्रदीप महाजन, दिनेश चौधरी, भालचंद्र चौधरी यांच्यासह माळी समाज बांधव उपस्थित होते. आपण समाजाचे काही देणे लागते. ही जाणीव ठेवीत मी त्यातून उतराई करेल, असेही त्यांनी याप्रसंगी सांगितले.

# चोपडा महाविद्यालयात भूगोल अभ्यासक्रम पुनर्रचना कार्यशाळा उत्साहात



प्रतिनिधी । चोपडा


**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव आणि महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी.पाटील महाविद्यालय, चोपडा येथील पदव्युत्तर व संशोधन भूगोलशास्त्र विभाग यांच्यातर्फे तृतीय वर्ष कला भूगोल विषयाच्या एकदिवसीय अभ्यासक्रम (राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०) पुनर्रचना कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.**

**➤ सदर कार्यशाळेसाठी विद्यापीठ परिक्षेत्रातील विविध महाविद्यालयातील एकूण १०० हून अधिक प्राध्यापक प्रतिनिधी सहभागी झाले होते. यावेळी विद्यार्थ्यांना भावी जीवनात मार्गदर्शक ठरेल, असा तृतीय वर्ष कला भूगोल विषयाचा अभ्यासक्रम ठरविण्यात आला. सदर कार्यशाळेत पाचव्या सत्रातील ७ पेपर व सहाव्या सत्रातील ७ पेपरचा अभ्यासक्रम गठीत करण्यात आला. सदर कार्यशाळेत अभ्यासक्रमांसंदर्भात सखोल चर्चा झाली. सहभागी प्रतिनिधींनी अभ्यासक्रम पेपरचे सादरीकरण करून त्यावर आपले मत व्यक्त केले. व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा. डॉ. शिवाजी पाटील मनोगतात म्हणाले की, अभ्यासक्रमात प्रात्यक्षिकाचा उपयोग केल्यास अध्ययन व अध्यापनात सुलभता निर्माण होईल.**

या कार्यशाळा आयोजनासाठी महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप सुरेश पाटील व संस्थेच्या सचिव डॉ.स्मिता संदीप पाटील यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या. या कार्यशाळेच्या उद्घाटन समारोहप्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. के. एन. सोनवणे हे उपस्थित होते. या कार्यशाळेचे उद्घाटन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता प्राचार्य डॉ. एस. एस. राजपूत यांच्या हस्ते वसुंधरा व वृक्षपूजन करून तसेच माजी शिक्षणमंत्री कै.अक्कासो. सौ.शरच्चंद्रिका सुरेश पाटील तसेच संस्थापक अध्यक्ष कै.मा. दादासाहेब डॉ.सुरेश जी.पाटील यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून करण्यात आले. या कार्यशाळेप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा. डॉ. शिवाजी पाटील, माजी व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. डॉ. डी. ए. सूर्यवंशी, भूगोल अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. सुरेश शेलार, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य माजी प्राचार्य डॉ. एस. एस. अलिझाड तसेच उपप्राचार्य प्रा.डॉ.आर.एम.बागुल, उपप्राचार्य प्रा.डॉ.ए.बी.सूर्यवंशी, कार्यशाळा तसेच महाविद्यालयाचे समन्वयक डॉ.शैलेशकुमार वाघ, अभ्यास मंडळ सदस्य विद्यार्थी प्रतिनिधी मयुरी पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यशाळेचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे समन्वयक व भूगोल विभाग प्रमुख डॉ.शैलेशकुमार वाघ केले. त्यातून त्यांनी तृतीय वर्ष भूगोल विषयाच्या अभ्यासक्रम पुनर्रचना कार्यशाळा आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. अभ्यासक्रम रचना प्रक्रियेत अध्यापकांनी सहभाग घ्यावा व विद्यार्थ्यांना अध्ययन सुकर होण्यास मदत होईल, अशा अभ्यासक्रमाची रचना करावी. यावेळी माजी प्राचार्य डॉ. एस. एस. अलिझाड मार्गदर्शन करताना म्हणाले की, मनवीन येणाऱ्या शैक्षणिक प्रणालीस सामोरे जाऊन विद्यार्थी हित जोपासणाऱ्या अभ्यासक्रमांची रचना करणे आवश्यक आहे, तरच विद्यार्थी स्पर्धेत टिकेल. यावेळी माजी अधिसभा सदस्य प्राचार्य डॉ.डी.ए.सूर्यवंशी मार्गदर्शन करताना म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात आंतर विद्याशाखीय घटकांचा वापर केल्यास विद्यार्थ्यांच्या ज्ञानकक्षा रुंदावतील. विषयाची व्याप्ती वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विविध शाखांशी सामंजस्य करार करायला हवेत.

यावेळी कार्यशाळेचे उद्घाटक तसेच विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता प्राचार्य डॉ.एस.एस. राजपूत उद्घाटनपर मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, अभ्यासक्रम हा रोजगारक्षम, विषयांचे सखोल ज्ञान देणारा असावा. भूगोल विषय सर्वसमावेशक असून पर्यावरण जडणघडणीत या विषयाचा महत्वाचा वाटा आहे. या विषयात मोठ्या संधी उपलब्ध असून विद्यार्थ्यांना त्याची ओळख करून देणे गरजेचे आहे. याप्रसंगी कार्यशाळेचे अध्यक्ष तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ. के. एन. सोनवणे अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना म्हणाले की, अभ्यासक्रम ठरविताना स्पर्धा परीक्षेचे घटक अभ्यासक्रमात समाविष्ट करावा. जेणेकरून विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होईल व विद्यार्थी स्पर्धेत टिकून राहिल यात शंका नाही.

# श्री पूर्णेश्वर महादेव मंदिराच्या द्वितीय वर्धापनदिनानिमित्त २६ ला महाप्रसादाचे आयोजन; भाविकांना उपस्थितीचे आवाहन



प्रतिनिधी । मुक्ताईनगर

**शहरातील संताजीनगर परिसरात असलेल्या श्री पूर्णेश्वर महादेव मंदिराचा द्वितीय वर्धापन दिन सोमवार, दि. २६ जानेवारी रोजी भक्तिभावपूर्ण वातावरणात साजरा होणार आहे.**

महादेवाच्या कृपेने व शहरातील सर्व शिवभक्तांच्या सहकार्याने लोकवर्गणीतून मंदिराचा जीर्णोद्धार व सुशोभिकरणाचे पवित्र कार्य यशस्वीरीत्या पूर्ण झाले आहे. महादेव मूर्तीची प्राणप्रतिष्ठा होऊन दोन वर्षे पूर्ण झाली आहेत. या मंगल प्रसंगाचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे यावर्षीही महाप्रसादाचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा महाप्रसाद सकाळी ११ ते सायंकाळी ४ या वेळेत श्री सिद्धेश्वर हनुमान मंदिर, संताजीनगर, नगरपंचायत कार्यालयामागे, मुक्ताईनगर येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास शहरासह परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे.

मंदिर उभारणीसाठी व विकासासाठी आतापर्यंत सहकार्य करणाऱ्या सर्व देणगीदारांचे व शिवभक्तांचे आयोजकांकडून मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले आहेत. यापुढेही मंदिराच्या धार्मिक व सामाजिक उपक्रमांसाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन श्री सिद्धेश्वर हनुमान मंदिर बांधकाम समिती, संताजीनगर, मुक्ताईनगर यांच्या वतीने करण्यात आले आहे.